# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १४/०९/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. काटोल :–** अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील जटामजिरी शिवार येथे दिनांक १२/०९/२०२२ चे १९.०० वा. ते २१.३० वा. सुमारास **पांडुरंग अजाबराव कोटजावळे (मृतक), वय ७० वर्ष, रा. जटामजिरी** हा ठेक्याने केलेल्या शेतामधील वालाच्या शेंगाचे वेलीला सपोर्ट म्हणुन डेऱ्या रोवीत असता ताराचा ईलेक्ट्रीक करंट लागुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दुर्वास पांडुरंगजी कोटजावळे, वय ३७ वर्ष, रा. जटामजिरी ता.काटोल यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि अविनाश बाहेकर मो.क्र. ८३०८४ ०५३७३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड :–** अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा नांदाशिंदे शिवार येथे **आनंदराव पंचम गजाम(मृतक), वय ६५ वर्षे, रा.नांदाशिंदे** यांना अती दारू पिण्याची सवय असल्याने ते सतत दारूचे नशेत रहात होते. ते काही दिवसांपासुन गुमसुम रहात होते. सुशांत सोमकुवर रा. नांदाशिंदे यांचे शेतात ते रोजमजुरीचे काम करीत असता दि १३/०९/२२ रोजी सकाळी ०६.०० वा. दरम्यान चहा पिवुन सुशांत सोमकुवर यांच्या नांदाशिंदे शिवारातील शेतात गेले सकाळी ०७.०० वा दरम्यान मोहल्यातील पांढुरंग वरखडे हे फिर्यादीचे घरी आले व त्याने सांगितले की, 'तुझे बाबा शेतात काय पिले माहीत नाही, तु लवकर चल' त्यावरून फिर्यादी याने जाउन पाहणी केली असता त्याचे वडील आनंद गजाम यांचे जवळ किटकनाशक फवारणीचे औषधाची बॉटल दिसली त्यांनी दारूच्या नशेत किटकनाशक औषध घेवुन आत्महत्या केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किशोर आनंदराव गजाम, वय ३२ वर्षे, रा. नांदाशिंदे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि शेन्द्रे मो.क्र. ९२७०९ ८८९०४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**